# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## सर्व संतांचा सोहळा - ०१ नोव्हेंबर २०२४

## श्रद्धावंतांच्या प्रार्थना

धर्मगुरू : माझ्या बंधुभगिनींनो, आज ख्रिस्तसभा सर्व संतांचा सोहळा साजरा करीत आहे. आदर्शमय जीवन जगून स्वर्गराज्यात गेलेले सर्व संत तेथे देव पित्याची अखंड स्तुती गात आहेत. ते सतत आपल्यासाठी प्रभूकडे प्रार्थना करीत आहेत. त्यांच्याद्वारे आपण आपल्या परमेश्वर पित्याकडे याचना करू या.

प्रतिसाद : **प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. आपले पोप फ्रान्सिस, बिशप्स, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना सर्व संतांच्या मध्यस्थीद्वारे ख्रिस्ताचे उत्तम प्रतिनिधी व याजक होण्यास पवित्र आत्म्याकडून सामर्थ्य व चांगल्या आरोग्याची देणगी लाभावी, **म्हणून आपण प्रार्थना करू या.**

२. डोंगरावरील प्रवचनाद्वारे ख्रिस्त आपल्याला जीवनात आनंदी व धन्यवादित कसे व्हावे ह्याविषयी मार्ग-दर्शन करीत आहेत. हे धन्योद्‌गार पूर्णपणे आचारणात आणणाऱ्या सर्व संताकडून आपल्याला प्रेरणा मिळावी व आपले जीवन प्रभूकृपेने परिपूर्ण व्हावे, **म्हणून आपण प्रार्थना करू या.**

३. संताच्या जीवन व उदाहरण याद्वारे आपल्याला प्रभू ख्रिस्ताच्या असीम प्रेमाची महती जाणून घेण्याची शक्ती मिळत असते. संताच्या जीवनावर मनन चिंतन करून ख्रिस्ताचे प्रेम आपल्याला अनुभवता यावे व ते इतरांना देखील देता यावे, **म्हणून आपण प्रार्थना करू या.**

४. युद्धमय व अशांतीत असलेल्या देशांतील प्रमुखांना सर्व संताच्या मध्यस्थीने त्यांचे वाद राजनैतिक मार्गाने सोडविण्यास प्रेरणा व धैर्य मिळावे तसेच आपल्या देशातील जातीय दंगलीत होरपळून निघत असलेल्या नागरिकांना साहाय्य मिळावे, **म्हणून आपण प्रार्थना करू या.**

५. प्रभूच्या सामर्थ्यशाली कृपेचा स्पर्श गरीब, आजारी व निराधार लोकांना व्हावा, आपल्याला चांगले हवामान लाभावे, आपल्या नागरिक समस्या दूर व्हाव्यात तसेच सर्व प्रकारच्या नैसर्गिक आपत्ती पासून आपले रक्षण व्हावे, **म्हणून आपण प्रार्थना करू या.**

थोडावेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक व कौटुंबिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

धर्मगुरू : हे स्वर्गीय पित्या, तुझ्या ख्रिस्तसभेच्या प्रार्थना ऐक. आमच्या श्रद्धेमधील उणिवा तुझ्या प्रेमाने भरून काढ. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.